पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

## वार्तापत्र

दिनांक: ०२/०५/२०२०

# कसनसूर दलम डिव्हीसी जहाल नक्षली सृजनक्का ठार

- **टीसीओसी सप्ताहादरम्यान नक्षलवाद्यांचा घातपाताचा कट उधळला.**
- **शासनाने तिचेवर १६ लाख रूपयांचे बक्षीस केले होते जाहीर.**

उपविभाग पेंढरी अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशन जारावंडी हद्दीतील मौजा सिनभट्टी जंगल परिसरात विशेष अभियान पथकाचे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना आज दुपारी सुमारे ३.३० वाजेच्या दरम्यान नक्षलवाद्यांनी विशेष अभियान पथकाच्या जवानांवर हल्ला चढविला स्वसंरक्षणार्थ व प्रत्युतरादाखल विशेष अभियान पथकाच्या कमांडोजनी नक्षलवाद्यांच्या दिशेने गोळीबार केला. जवानांचा वाढता दबाव पाहून नक्षलवाद्यांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळ काढला.

विशेष अभियान पथकाच्या जवानांनी सदर जंगल परिसरात शोध अभियान राबविले असता, जहाल महीला नक्षली आणि डिव्हीसी कसनसूर दलम सृजनक्का ऊर्फ चिनक्का ऊर्फ जैनी चैतु अर्का वय ४८ वर्षे रा. गोपनार,लाहेरी हिचा मृतदेह मिळून आला. सृजनक्का ही भामरागड दलममध्ये सन- १९८८ मध्ये दाखल झाली होती. तिच्यावर गडचिरोली जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला एकुण १४४ गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. शासनाने तिच्यावर एकुण १६ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्याचबरोबर सदर ठिकाणाहून १ एके- ४७ रायफल, प्रेशर कुकर, क्लेमोर माईन तसेच मोठ्या प्रमाणावर नक्षल साहित्य मिळून आले. प्रेशर कुकर, क्लेमोर माईन हे घटनास्थळावर नष्ट करण्यात आले. या ठिकाणी नक्षलवाद्यांनी कॅम्प उभारुन टीसीओसी सप्ताहाच्या अनुषंगाने देश विघातक कृत्य करण्याच्या तयारीत होते. गडचिरोली पोलीस दलाच्या सर्तकतेमुळे नक्षलवाद्यांचा कट उधळुन लावण्यात यश प्राप्त झाले. घटनेनंतर सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी सदर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सी-६० च्या बहादुर जवानांचे कौतुक करत त्यांना रोख पारितोषिक जाहीर केले आहे.




E-60